# आरक्षणाचा लाभ वंचितांनाही

गेल्या अनेक वर्षांपासून ओबीसींसाठी असलेल्या २७ टक्के आरक्षणाचे विभाजन करावे, या मागणीसाठी संघर्ष सुरू होता. केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच यासंबंधीचा निर्णय घेतला असून तो सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. बारा बलुतेदार, भटके विमुक्त आणि वंचित समाजाला या निर्णयाने लाभ होणार आहे. या निर्णयाची मीमांसा करणारा लेख...

हरिभाऊ राठोड









**केंद्रीय मंत्रिमंडळाने** नुकताच केंद्रीय ओ.बी.सी. २७ टक्के आरक्षणाचे विभाजन करण्याचा निर्णय घेतला आहे. सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने, अत्यंत महत्त्वाचा व दूरगामी परिणाम सदर निर्णय करणार आहे. खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय देणारा भटक्या विमुक्त, बारा बलुतेदार आणि अति मागास या वंचित घटकाला ओ.बी.सी.च्या आरक्षणाचा लाभ मिळवून देणारा आहे.

ओ.बी.सी.च्या आरक्षणाचे विभाजन करण्यासाठी एका आयोगाची निर्मिती करण्यात आली असून हा आयोग अध्यक्षांच्या नियुक्तीपासून तीन महिन्यांत आपला अहवाल सादर करेल. हा आयोग 'इतर मागासवर्गीयांचे उपवर्गीकरण चौकशी आयोग' या नावाने ओळखला जाईल. मागासवर्गीयांच्या यादीमध्ये अत्यंत मागास, भटके विमुक्त आणि बारा बलुतेदार अशा घटकांची उपश्रेणी करण्याची शिफारस करेल. मागासवर्गीयांचे उपविभाजन करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार या प्रकरणामध्ये १६ नोव्हें. २०१२ रोजी असा निर्णय दिला आहे की , ओ.बी.सी.च्या २७ टक्के आरक्षणाचे विभाजन करता येईल. कायद्याची त्यात कुठेही आडकाठी असणार नाही. यापूर्वी आंध्र प्रदेश, तेलंगणा, पॉंडिचेरी, हरयाणा, झारखंड, पश्चिम बंगाल, बिहार, तामिळनाडू आणि महाराष्ट्र या राज्यांत भटके विमुक्त यांना वेगळे आरक्षण दिलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तथा मंडल आयोगाला जोडलेल्या एल. आर. नायक यांच्या टिप्पणीनुसार आणि महाराष्ट्राच्या आरक्षणाच्या धर्तीवर ९ ऑगस्ट १९९७ रोजी पहिल्यांदा बोंबाबोंब मोर्चात ही मागणी आम्ही केली होती. या लढ्याची सुरुवात भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथजी मुंडे यांच्या आशीर्वादाने आम्ही सुरू केली होती.

एल. आर. नाईक, यांनी मंडल आयोगाच्या अहवालासोबत आपल्या भिन्न मतपत्रिकेमध्ये ज्या तळमळीने आपले विचार मांडले होते त्याला उशिरा का होईना आता न्याय देण्यात आला आहे. ही गोष्ट वंचित घटकांना सामाजिक न्याय देण्याच्या बाबतीत दूरगामी परिणाम करणारी आहे. नाईक यांनी या भिन्न मतपत्रिकेमध्ये काय म्हटले होते त्याचे अवलोकन करू या.

''मला प्रमाणिकपणे असे वाटते की, ओ.बी.सी. यादीमध्ये उल्लेख केलेल्या जाती/ वर्गांमध्ये एकजिनसीपणा असला तरी त्या सर्व जाती व सर्व वर्ग एकाच सामाजिक वा शैक्षणिक मागासलेपणाच्या पातळीवर नाहीत. त्यांच्या सुरक्षिततेसाठी ज्या उपायांची शिफारस केलेली आहे ते दुर्दैवी जाती/ वर्गांपर्यंत पोचणार नाहीत व समानतावादी समाज निर्माण करण्याच्या घटनेचे ध्येय ही एक कल्पनाच बनून राहील, अशी मला भीती वाटते. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल स्टडीजच्या अहवालात ( भाग-४ ) काही जमातीचा उल्लेख आहे की, ज्यांचा ओ.बी.सी. यादीमध्ये उल्लेख आहे. अशा जमातींना 'मागासलेल्या जातीतील मध्यमस्तरीय जमाती' असे म्हणून या अशा जमातींना त्यांच्या संख्याबळावर किंवा प्रदीर्घ काळ भारत वर्षातील शहरे व खेडी यामध्ये प्रगत जाती-जमातींबरोबर सहअस्तित्वाच्या बळावर भारतातील जातीय व्यवस्थेमध्ये स्वतःचे अस्तित्व दाखवून दिले आहे. अशा जमातींना भविष्यात उचित प्रोत्साहन व संधी प्राप्त करून दिली, तर त्या जाती सर्वसामान्य जनतेत आज ना उद्या मिसळून जातील यात मला शंका नाही. परंतु ओ.बी.सी.च्या यादीमध्ये अशा अनेक जाती-जमाती आहेत की ज्या सामाजिक तसेच आर्थिक अशा दोन्ही दृष्टीने अत्यंत मागासलेल्या असल्यामुळे नजीकच्या भविष्यात अशा तऱ्हेने सर्वसामान्य जनतेत मिसळून जाऊ शकणार नाहीत. त्यांचा सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा हा त्यांच्या आर्थिक मागासलेपणाला कारणीभूत आहे.

अशा वर्गांना 'दबले गेलेले मागासलेले वर्ग' असे यापुढे संबोधले जाईल. हे वर्ग 'मागासलेल्या जातीतील मध्यमस्तरीय जमाती'पेक्षा वेगळ्या असतील. अशा 'दबल्या गेलेल्या मागसवर्गीयांना' प्रगती साधण्यासाठी व अधिक ज्ञान मिळण्यासाठी खूप वेळ लागेल, कारण त्या अत्यंत मागासलेपणात रुतून बसल्या आहेत. त्यासाठी राष्ट्रीय स्तरावरून त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत व ते त्यांच्यापर्यंत पोचले पाहिजेत. हे काम चतुरपणे केले पाहिजे त्यामुळे त्यांना मुख्य ओ.बी.सी.च्या यादीतून वेगळे करून त्यांचा एक वेगळा गट केला पाहिजे.

उदा. बलुतेदार, अलुतेदार जसे न्हावी, खाती वाडी, लोहार, सोनार, कुंभार, सुतार, धोबी, तेली, माळी, कोळी, धनगर, आगरी, गोवारी, इत्यादी.

त्याद्वारे त्यांच्यामध्ये सुरक्षिततेच्या उपायासांठी समान वर्गात किंवा बऱ्याचशा अंशी समान असलेल्या समान वर्गांत निरोगी स्पर्धा होईल व असमान वर्गात स्पर्धा होणार नाही. याच कारणांसाठी ओ.बी.सी. यादीतील इतर जमातींनी वेगळा गट तयार करावा.

संपूर्ण देशाच्या हिताचा विचार केल्यास ही एक आवश्यक गोष्ट आहे.

माझ्या मते ज्या जमातींचे पारंपरिक व्यवसाय पुढीलप्रमाणे आहेत :- शेती उत्पादनाचे वितरण, खाण्याची पाने उत्पादन करणे, धनगर, विविध कारागीर, निरोप देणारे, रंगारी, विणकर यांसारखे किरकोळ व्यवसाय व शेतकी व्यवसाय, गुरे पाळणे, देवळात पूजा करणे व इतर सेवा, ताडी विकणे, तेल गाळणे, लढाई करणे, ज्योतिष सांगणे इत्यादी. अशा जमाती या मागासवर्गातील 'मध्यस्तरीय जमाती' या गटात मोडतात. हे वर्ग अनादी काळापासून प्रगत जातींबरोबर राहिले आहेत व त्यामुळे त्यांना अशा प्रगत व उच्च वर्गांबरोबर मिसळून जाण्याच्या संधी उपलब्ध आहेत. मात्र 'दबलेल्या वर्गांना' त्यांच्या पारंपरिक व्यवसायामुळे, भटक्या वृत्तीमुळे इतर वर्गीयांबरोबर मिसळणे नाकारले गेले, त्यांना वाळीत टाकले गेले व त्यांची सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. सर्वसाधारणपणे यासाठी पूर्वी गुन्हेगार असलेल्या जाती, भटक्या व विमुक्त जाती, खाणीत काम करणारे, कोळी, नावाडी, भोई, पालखी वाहणारे, मिठागरात काम करणारे, धोबी, न्हावी, भंगी, टोपली विणणारे, लोकरी कपड्यांचे व्यापारी, कातडी कमावणारे, भूमिहीन शेतमजूर, पाणके ताडी गाळणारे, आदिवासी जमाती इत्यादींचा या गटात समावेश आहे.

या नावावरूनच त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक मागसलेपणाचा बोध होतो. त्यामुळे घटनाकारांनी या वर्गांना वर्गीकरणासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करून घेणे आवश्यक होते. माझे असे प्रामाणिक मत आहे की, घटनाकारांच्या या चुकांमुळे सामाजिक, आर्थिक व राजकीय आधारित समतावादी समाजाची रचना होण्यात अडथळे निर्माण झाले आहेत.

भारतीय राज्यघटनेमधील स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तीन महत्त्वाच्या मुद्द्यांचा खरा अर्थ व लाभ यापासून हे सर्व जण वंचितच राहिले आहेत. काही राज्यांमधील वर्गीकरणाच्या आधारे ( सर्व राज्यांच्या नव्हे ) असे म्हणता येईल की, या जमातीपैकी बहुसंख्य जमाती अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती आहेत.

'मोठा मासा छोट्या माशाला गिळतो' ही म्हण भारतातील जात व्यवस्थेला लागू पडते. त्यामुळे सुरक्षिततेचे सर्व उपाय व त्यांचे लाभ समाजाच्या सर्व विभागांना समान व विवेकपूर्ण पद्धतीने विभागले गेले पाहिजेत याची सर्वतोपरी काळजी घेतली पाहिजे.

असमानांमध्ये स्पर्धा टाळणे व समानांमध्ये स्पर्धा घडवून आणणे या दोन मार्गांनी हे साध्य होऊ शकते. म्हणून मी असे प्रस्तावित करतो की, ओ.बी.सी.च्या यादीचे 'अ' आणि 'ब' असे दोन विभाग करावेत. 'अ' यादीमध्ये 'दबलेले वंचित वर्ग' समाविष्ट असतील, तर 'ब' यादीत 'मागास जमातीतील मध्यमवर्गीय जमाती' असतील. राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या संदर्भात 'दबलेल्या वंचित वर्गाची' यादी सूची-२ मध्ये दिलेली आहे.

**आरक्षण किती असावे ?**

भारतीय लोकसंख्येची जात व धर्म यानुसार टक्केवारी मुख्य अहवालात नमूद केली आहे. अहिंदू जमातीसकट अन्य मागासलेल्या जातीची टक्केवारी ५२ टक्के आहे. हिंदू मागासलेल्या जाती/ गटांची टक्केवारी ४३.७० टक्के आहे. तर अहिंदू मागासलेल्या जाती/गटांची टक्केवारी ८.४० टक्के आहे. अन्य मागासलेल्या जातींची वर्गवारी 'दबलेले वंचित वर्ग' व 'मागासलेल्या जातीतील मध्यमवर्गीय जमाती' या तत्त्वावर वर्गीकरण केल्यास त्यांची होणारी टक्केवारी सूची १ मध्ये दिली आहे. यावरून असे दिसून येईल की, 'दबलेले वंचित वर्गाची' लोकसंख्या २५.३४ टक्के आहे व मागासलेल्या जातीतील मध्यस्तरीय जमातीची लोकसंख्या २६.४४ टक्के आहे. म्हणजेच ते जवळजवळ सारखेच आहेत.

बऱ्याच चर्चेनंतर आयोगाने भारत सरकारच्या केंद्र सरकारच्या सर्व सेवांमध्ये २७ टक्क्यांपर्यंत आरक्षणाची शिफारस केली आहे. मी याच्याशी पूर्णपणे सहमत आहे.

आयोगाने अशीही शिफारस केली आहे की, केंद्र सरकार तसेच राज्य सरकार यांनी चालवलेल्या वैज्ञानिक, तांत्रिक व व्यावसायिक संस्थामध्येसुद्धा २७ टक्के आरक्षण करावे.

'दबलेले वंचित वर्ग' तसेच भटक्या व विमुक्त जमातीमधील मध्यमवर्गीय जमाती यांच्या मागासलेपणाच्या बाबतीत तुलना होऊ शकते. तसेच न्यायोचित दृष्टीने मी अशी शिफारस करतो की, केंद्र सरकारच्या सर्व सेवांमध्ये तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये शिफारस केलेल्या २७ टक्के आरक्षणापैकी दबलेल्या वंचित वर्गांना १५ टक्के आरक्षण द्यावे. त्यांना अनुसूचित जाती-जमातींच्या सर्व सवलती मिळाव्यात. मी राजकीय आरक्षणाची शिफारस करीत नाही. मात्र त्यांनी एकत्र यावे व संघटना बांधावी असे मी त्यांना आवाहन करतो. आपल्या देशातील राज्यकर्त्यांना असा सावधानतेचा इशारा देऊ इच्छितो की, जोपर्यंत वंचित लोकांची व त्यांची बरोबरी होत नाही, तोपर्यंत समतावादी समाजाची घडण होणार नाही. म्हणून त्यांनी मागासलेल्यांसाठी केलेल्या आरक्षणाविरुद्ध कोणतेही आंदोलन करू नये व तसे केल्यास त्यांची व देशाची हानी होईल.

नाईक यांनी जे विचार मांडले होते तोच धागा पकडून सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठाने काय म्हटले होते हे बघणे सयुक्तिक ठरेल. न्यायालयाने असे मत व्यक्त केले होते की, मागासवर्गीयांच्या केंद्रीय यादीतील मागासवर्ग व अति मागास व भटके विमुक्त अशी वर्गवारी करण्यास संविधान किंवा कायदा याची कुठल्याही प्रकारची बाध्यता असणार नाही. न्यायालयाने एक उदाहरण देऊन समजावण्याचा प्रयत्न केला होता. जसा की दगड फोडणारा वडार व सोन्या-चांदीचे दागिने बनवणारा सोनार यांना एकच वर्गात ठेवता येणार नाही. केंद्रीय २७ टक्के आरक्षणाचे मंडल आयोगाच्या माध्यमातून व्ही. पी. सिंग यांनी आरक्षण दिले होते. त्याचा फायदा काही बोटावर मोजण्याइतक्या ओ.बी.सी.मधल्या उच्चवर्णीयांनी घेतला. भटके विमुक्त, बलुतेदार, आलुतेदार हा वंचित घटक वंचितच राहिला. आता मात्र केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे या वंचित घटकाला त्यांच्या लोकसंख्येच्या अनुसरून आरक्षणाचा लाभ होईल.

या निर्णयामुळे भटके विमुक्त जसे की, बेरड, बेस्तर, भामटा, कैकाळी, कटाबु, बंजारा, जुही बंजारा, पालपारधी, गाव पारधी, राजपारधी, राजपूत भामटा, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद, गोसावी, बेलदार, भराडी, भुते, चित्रकथी, गारोडी, लोहार, गोल्ला, गोंधळी, गोपाळ, हेळवे, जोशी, काशीकापडी, कोल्हाटी, मैराळ, मसनजोगी, नंदीवाले, पांगुळ, रावळ, सिक्कलगर, वगळले, वैदू, वासुदेव, भोई, बहुरूपी, ठेलारी, ओतारी, धनगर, वंजारी, जोगी, गवळी, तसेच बलुतेदार, अलुतेदार जसे नावी, खाती वाडी, लोहार, सोनार, कुंभार, सुतार, धोबी, तेली, माळी, कोळी, धनगर, आगरी, गोवारी, साळी, कोष्टी इत्यादी अनेक समाज घटकांना लाभ होणार आहे. केंद्रीय कार्यालयांमध्ये त्यांना नोकरीची संधी प्राप्त होईल.

असे जरी असले तरी मागील अनुभव आमचा चांगला नाही. अनेक आयोग आले आणि गेले, परंतु प्रश्न सुटला नाही. वंचित व शोषित घटकाकडे नेहमीच दुर्लक्ष होत राहिले आहे. ओ.बी.सी. समाजाच्या राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व उभे राहू शकले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाच्या उत्थानासाठी खूप प्रयत्न केले. परंतु समाज जागृत झाला नाही. आजही हा समाज जागृत नाही हीच खरी शोकांतिका आहे.

**(लेखक माजी खासदार आणि विद्यमान आमदार आहेत.)**

# वंचितांना न्याय

हरिभाऊ राठोड

**ओबीसींच्या आरक्षणाचे विभाजन करण्यासाठी एका आयोगाची निर्मिती करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. मागासवर्गीयांतील अतिमागासांना न्याय मिळण्याचा मार्ग आता त्यामुळे मोकळा झाला आहे.**



भारत सरकारने २३ ऑगस्ट २०१७ रोजी एक क्रांतिकारक निर्णय घेतला. ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणाचे आता विभाजन करण्यात येणार आहे आणि त्यासाठी एका आयोगाची निर्मितीही केली जाणार आहे.

या निर्णयामुळे वंचितांना न्याय मिळेल आणि अत्यंत दुर्लक्षित असलेल्या भटके विमुक्त, बाराबलुतेदार, अलुतेदार व अतिमागास या समाजघटकाचे राहणीमान उंचावण्यासाठी याचा उपयोग होईल.

देशात ६६६ भटक्या व विमुक्त जाती आहेत, तर ५४० जाती अत्यंत मागास आहेत. या सर्वांना केंद्र सरकारच्या निर्णयाचा लाभ मिळेल.

अशा किती जाती सांगाव्यात ज्या अजूनही न्यायापासून आणि हक्कांपासून वंचित आहेत.. बलुतेदार, अलुतेदार जसे न्हावी, खाती वाडी, लोहार, सोनार, कुंभार, सुतार, धोबी, तेली, माळी, कोळी, आगारी, गोवारी, शिंपी, साळी, कोष्टी.. याशिवाय भटके विमुक्त व अतिमागासांतील जाती - बेरड, बेस्तर, भामटा, वैसकाळी, कटाबू, बंजारा, पालपारधी, गाव पारधी, राजपारधी, राजपूत भामटा, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद, गोसावी, बेलदार, भराडी, भुते, चित्रकथी, गारोडी, लोहार, गोल्ला, गोंधळी, गोपाळ, हेळवे, जोशी, काशीकापडी, कोल्हाटी, मैराळ, मसनजोगी, नंदीवाले, पांगुळ, रावळ, सिक्कलगर, वगळले, वैदू, वासुदेव, भोई, बहुरूपी, ठेलारी, ओतारी, माकडवाले, गवळी.. या सगळ्याच जाती केवळ त्यांच्या हक्कांअभावी आज मागे पडलेल्या आहेत.

गेली २० वर्षे आम्ही हा आरक्षणाचा लढा लढतो आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे व प्रमोद महाजन तसेच अटलबिहारी वाजपेयी, व्यंकय्या नायडू यांनी या प्रश्नात लक्ष घातले होते. पंढरपूरच्या विठोबारायाला साक्षी ठेऊन २० जानेवारी २००४ रोजी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी केलेल्या घोषणेची भाजपाने पूर्तता केली असे म्हटले तर वावगे होणार नाही.

रेणके आयोगाची निर्मिती, लोकसभेत २००८ साली मी मांडलेले खासगी बिल, श्रीमती सोनिया गांधी यांनी राष्ट्रीय सल्लागार समितीमध्ये (एनएसी) या विषयावर केलेली शिफारस आणि माझ्या विनंतीनुसार ओबीसींचे वर्गीकरण करण्याच्या संदर्भात तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी केलेल्या कार्यवाहीनुसार राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्या. व्ही. ईश्वरअया यांनी २ मार्च २०१५ रोजी केलेल्या शिफारशींनुसार वर्गीकरण होणार आहे. या सर्व बाबी इंटरनेटवर उपलब्ध आहेत.

दिनांक २३ ऑगस्ट २०११ रोजी मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतला, त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार या खटल्यामध्ये दिलेल्या निकालाचा हवाला दिलेला आहे. त्याचा सारांश असा..

१. प्रत्येक राज्यात विमुक्त जमाती व भटक्या जमातींच्या याद्या आहेत. ज्या राज्यात अशा जमाती अनुसूचित जातींच्या यादीत समाविष्ट नाहीत, त्या राज्यात या जमाती इतर मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट आहेत. विमुक्त जमाती व भटक्या जमाती या इतर मागासवर्गीयांमधील अधिक गरीब जाती आहेत. त्यामुळे त्यांना अनुसूचित जाती-जमातीपेक्षा अधिक संरक्षणाची आवश्यकता आहे. याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने भारत सरकार व राज्य सरकारांना स्पष्ट आदेश दिले आहेत की, इतर मागासवर्गीयांमध्ये उपवर्गीकरण करणे आवश्यक आहे; ज्यायोगे त्यांच्यासाठीच्या २७ टक्के आरक्षणातून त्यांच्यातील अधिक गरीब व अधिक दुबळ्या वर्गांना वेगळे आरक्षण देता येईल. इतर मागासवर्गीयांमध्ये असलेल्या अनेक जाती-जमाती व गट सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय विकासाच्या बाबतीत एकाच समान पातळीवर नाहीत. त्यांच्यामध्ये फार मोठे फरक आहेत.

याबाबत (९२-अ) निकालातील परिच्छेद असा.. 'मागासवर्गीयांमध्ये मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे उपवर्गीकरण करण्यात कोणताच घटनात्मक किंवा कायदेशीर अडथळा नाही. असे केलेच पाहिजे असे आमचे मत नाही. जर एखाद्या राज्याने असे वर्गीकरण केले तर आमच्या मते ते अवैध होणार नाही. मंडल आयोगाने कोणता निकष लावला आहे तो आपण ध्यानात घेऊ.. ज्या जातीला, गटाला किंवा वर्गाला अकरा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाले आहेत त्यांना मागसलेली जात/वर्ग समजले जाईल. हजारो जाती, गट, वर्ग यांना समान गुण मिळालेले नाहीत. असे अनेक वर्ग आहेत की त्यांना २० ते २२, तर काहींना ११ ते १३ गुण मिळाले आहेत. या दोन वर्गांमध्ये फरक नाही. उदारणार्थ- व्यावसायिक गट.. सोनार व तडर (दगडे फोडण्याचा पारंपरिक व्यवसाय करणारे आंध्र प्रदेशमधील व्यावसायिक. हे दोन्ही गट इतर मागासवर्गीयांत समाविष्ट आहेत. त्यांत सोनार पुढारलेले (कमी मागास) आहेत, हे सत्य कोणी नाकारु शकत नाही. जर दोघांना एकाच गटात समाविष्ट केले व त्या गटाला आरक्षण दिले तर सोनारांनाच सर्व आरक्षण मिळेल व तडरांना काहीच उरणार नाही. अशा स्थितीत मागासलेल्या वर्गांमध्ये अधिक मागासवर्गांना आरक्षणाचे फायदे मिळावे यासाठी इतर मागासवर्गीयांत आरक्षण करणे आवश्यक आहे, असा विचार एखादे राज्य करु शकेल. यासाठी सीमारेषा कोठे काढायची व उपवर्गीकरण कसे करायचे ही बाब आयोग व राज्ये यांनी ठरवायचे आहे. जोपर्यंत ते योग्य तऱ्हेने केले जात आहे, तोपर्यंत न्यायालये त्यात हस्तक्षेप करणार नाहीत. या बाबतीत आंध्र प्रदेशचे उदाहरण देता येईल. त्यांनी मागासवर्गीयांचे विभाजन चार उपगटात केले आहे. गट अ- अमुलवासी जमाती (ॲबओरिजिनल), विमुक्त जमाती, भटक्या व अर्धभटक्या जमाती. ब गटात व्यवसायिक येतात. जसे टॅपर्स (ताडी /दारू गाळणारे), विणकर, सुतार, लोहार, सोनार, कामसलिन इत्यादी. गट क- ज्या अनुसूचित जातीतील लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे असे लोक व त्यांचे वंशज. गट ड- अ, ब व क या गटात समाविष्ट न झालेले सर्व वर्ग/ जमाती /गट यात येतात. मागासलेल्या वर्गांसाठीचे २५ टक्के आरक्षण उपरोक्त उपवर्गात त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विभागलेले आहेत.

या प्रश्नाकडे पाहण्याचा दुसराही एक दृष्टिकोन आहे. घटनेच्या कलम १६ (४) मध्ये 'नागरिकांचा मागासलेला वर्ग' एवढाच उल्लेख आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती असा कलम १५ (४) प्रमाणे उल्लेख त्यात नाही. तरीपण अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती 'नागरिकांचा मागासलेला वर्ग' या गटात समाविष्ट आहेत. त्यांच्यासाठी वेगळ्या आरक्षणाची तरतूद केली आहे.

आपल्या देशात ते सर्वमान्य झाले आहे. जर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांना एकाच गटात समाविष्ट केले तर सर्व फायदे फक्त इतर मागासवर्गीयांनाच मिळतील व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तशाच कोरड्या राहातील. याच तर्कशास्त्रानुसार इतर मागासवर्गीयांचे 'मागासवर्गीय' व 'अधिक मागासवर्गीय' असे उपवर्गीकरण करता येईल. हे असे झालेच पाहिजे असे आम्ही म्हणत नाही, आम्ही एवढेच म्हणतो की जर



राज्यांनी तसे केले तर ते कायद्याला अमान्य असणार नाही..'

वरील बाबी लक्षात घेता, केंद्र व राज्य सरकारांनी विमुक्त जमाती व भटक्या जमातींचे इतर मागासवर्गीयांच्या गटामध्ये उपवर्गीकरण करावे व त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे.

न्यायालयाने जे आदेश दिले आहेत, त्याची शिफारस एल. आर. नायक, मंडल आयोगाचे सदस्य व माजी खासदार यांनी केली आहे.

'वंचित मागासलेल्या गटांना' अधिक सुरक्षा, वेगळा कोटा व प्राधान्य द्यावे, ज्यायोगे इतर मागासवर्गीयातील अधिक प्रगत गटाद्वारे त्यांचे शोषण होणार नाही, असे त्यांनी सूचित केले आहे.

आपल्या टिप्पणीत त्यांनी म्हटले आहे की, 'मोठा मासा छोट्या माशाला गिळतो' ही म्हण भारताच्या जाती व्यवस्थेला लागू पडते. त्यामुळे सुरक्षिततेचे सर्व उपाय व त्यांचे लाभ समाजाच्या सर्व विभागांना समान व विवेकपूर्ण पद्धतीने विभागले गेले पाहिजेत. असमानांमध्ये स्पर्धा टाळणे व समानांमध्ये स्पर्धा घडवून आणणे या दोन मार्गांनी हे साध्य होऊ शकते. म्हणून मी असे प्रस्तावित करतो की, सामायिक यादीचे अ आणि ब असे दोन भाग करावेत. 'अ' यादीमध्ये 'दबलेले वंचित वर्ग', तर 'ब'मध्ये मागास जमातीतील 'मध्यस्तरीय जमाती' असतील..

२० वर्षांपासूनचा आमचा हा लढा असून, आमची तपश्चर्या आता कामी आली आहे. सर्वांच्या प्रयत्नामुळे २०११ मध्ये सर्व जातींची आर्थिक, सामाजिक आणि जातनिहाय पाहणी करण्यासाठी सरकारला कायदा करण्यास भाग पाडले होते.

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे जस्टीस व्ही. ईश्वरय्या यांनीसुद्धा मार्च २०२५ मध्ये एक अहवाल देऊन ओबीसीचे तीन भागात विभाजन करा, असा अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला होता.

भाजपा सरकारने घेतलेला हा निर्णय सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. ओबीसीच्या आरक्षणाचे विभागजन करण्यासाठी एका आयोगाची निर्मिती करण्याबाबतचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. येत्या तीन महिन्यांच्या आत त्यांना अहवाल देण्यास सांगण्यात आले आहे.

तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी डॉ. गणेश देवी यांच्या नेतृत्वाखाली टेक्निकल अडॅव्हायझरी समिती नेमली होती. त्या कमिटीचा अहवाल दाखल झाला, परंतु तो अहवाल रेणके आयोगाने दडपला होता. त्यामुळे एका मोठ्या समाजाला सामाजिक न्यायापासून वंचित ठेवण्यात आले होते. आत याची खबरदारी सर्वांनी घ्यावी. आजपर्यंत या जमातीसाठी ७ ते ८ आयोग नेमले; परंतु निर्णय काहीही नाही, असे होऊ नये एवढीच माफक अपेक्षा!

(लेखक माजी खासदार व विद्यमान आमदार आहेत.)